**ठळक बातम्या**

- जगभरात १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा, गेल्या १० वर्षात योगाभ्यासाविषयी जगभरात जनजागृती वाढल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यातही सर्वत्र योग दिनाचा उत्साह

- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची शेतकरी संघटना आणि कृषी तज्ज्ञांसोबत अर्थसंकल्पपूर्व चर्चा

**आणि**

- मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा आज समारोप, पुरस्कार विजेत्यांविषयी उत्सुकता

**<><><><><>**

गेल्या १० वर्षात योगाभ्यासाची व्याप्ती वाढली असून योग पर्यटनाविषयीचं आकर्षण वाढल्यामुळे लोक भारतात त्याचं शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यासाठी येतात, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. योग दिनाचा मुख्य समारंभ आज जम्मू काश्मीरात श्रीनगर इथं शेर ए काश्मीर आंतरराष्ट्रीय परिषद केंद्रात झाला. त्यावेळी ते बोलत होते. भौतिक, मानसिक आणि आध्यात्मिक वाढीसाठी योगाच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला. योगाची उपयुक्तता जगभरातल्या लोकांना समजल्यामुळे योगाभ्यास करणाऱ्यांची संख्या वाढली आहे असंही ते म्हणाले. तुर्कमेनिस्तान, सौदी अरेबिया अशा अनेक देशातल्या शैक्षणिक संस्थांमधे योगशास्त्राचा समावेश अभ्यासक्रमात केल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या योग हा

संशोधनाचा विषय झाल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी नायब राज्यपाल मनोज सिन्हा, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. योगशास्त्र ही भारतानं मानवतेला दिलेली अनोखी देणगी असल्याचं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत संसदभवन इथं आज विशेष योग सत्र आयोजित करण्यात आलं होतं. त्याचं नेतृत्व लोकसभेचे माजी सभापती ओम बिर्ला यांनी केलं. योगाभ्यास हा मानवी आयुष्याचा पाया बनला असून त्यानं सगळ्या सांस्कृतिक सीमा ओलांडल्या आहेत, असं ते यावेळी म्हणाले. केंद्रीय परराष्ट्रव्यवहार मंत्री एस जयशंकर, आरोग्य मंत्री जे पी नड्डा, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडविय अशा अनेक मान्यवरांनी दिल्लीत योग दिन साजरा केला.

**<><><><><>**

योगाच्या अमूर्त ठेव्याचं रक्षण करणं आणि त्याचा प्रचार - प्रसार करणं हे प्रत्येक भारतीयाचं कर्तव्य आहे, असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केलं. राजभवनमधे त्यांच्या उपस्थितीत योगसत्राचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी ते बोलत होते.

भारतीय जीवन शैलीची आयुर्वेद आणि योगा ही दोन विशेष अंगं आहेत, असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलं. गेट वे ऑफ इंडिया इथं आयोजित

योग दिवसाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी उत्तर मुंबईत चारकोप मार्केट इथं योगा ऑन स्ट्रीट आणि इतर कार्यक्रमात सहभागी होत योगासनं केली.

**<><><><><>**

जगभरात विविध देशांमध्ये आज १०वा जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

**अमेरिकेच्या** न्यूयॉर्क शहरातल्या प्रसिद्ध टाईम्स स्क्वेअर इथं भारतीय वाणिज्य दूतावासाने योग दिनाच्या एक दिवसीय सोहळ्याचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमात एकाच वेळी १० हजार नागरिकांनी योगासनं केली.

**नेपाळची** राजधानी काठमांडू इथं असलेल्या भारतीय दूतावासानं पतंजली योगपीठाच्या संयुक्त विद्यमाने पोखरा शहरात योग दिनाचं आयोजन केलं. या कार्यक्रमात योगाभ्यास तज्ज्ञांनी विविध योग प्रकार दाखवून त्यांचे फायदेही सांगितले. गंडकी प्रांताचे मुख्यमंत्री सुरेंद्र राज पांडे यांनी योगसाधना ही निरोगी जीवनासाठी आवश्यक असल्याचं प्रतिपादन केलं. नेपाळचे भारतीय राजदूत नवीन श्रीवास्तव यांनी योग दिनाचा हा सोहळा भविष्यात नेपाळ आणि भारत यांच्यातील पर्यटन विकासासाठी सहाय्यक ठरेल, असं यावेळी म्हटलं.

**श्रीलंकेत** हंबनटोटा इथल्या भारतीय वाणिज्य दूतावासाने ऐतिहासिक अशा गाले किल्ल्यावर योग दिन साजरा केला. या सोहळ्यात ३०० नागरिकांनी सहभाग घेतला.

**बांगलादेशमध्ये** भारतीय उच्च आयोगातर्फे योग दिन सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं. भारतीय उच्च आयुक्त बिनोय जॉर्ज यांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग अत्यंत लाभदायी असल्याचं प्रतिपादन यावेळी केलं.

**<><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी आज नवी दिल्लीत देशातल्या शेतकरी संघटनांची आणि कृषीअर्थतज्ज्ञांची अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली. यावेळी अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी, अर्थविभागाचे सचिव टी.व्ही. सोमनाथन, मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंथा नागेश्वरन आदी अधिकारी उपस्थित होते. या आधी अर्थमंत्र्यांनी आर्थिक आणि गुंतवणूक बाजारातील तज्ज्ञांबरोबर अर्थसंकल्पपूर्व बैठक घेतली होती.

**<><><><>**

वैद्यकीय प्रवेशासाठी नीट परिक्षेनंतर होणाऱ्या कौन्सिलिंगला स्थगिती द्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज पुन्हा नकार दिला आहे. या प्रकरणी न्यायालयानं राष्ट्रीय चाचणी संस्थेला नोटीस पाठवली आहे. सर्वोच्च न्यायालयानं नीट परिक्षेतल्या गैरव्यवहारांच्या प्रकरणातल्या सर्व याचिका एकत्र करुन त्यांची सुनावणी ८ जुलै रोजी करण्याचा निर्णयही घेतला आहे.

**<><><><>**

तमिळनाडू च्या कल्लाकुरीची इथल्या विषारी दारु सेवन केल्यानं मृत्यू पावलेल्यांची संख्या आता ४७ झाली आहे. या विषारी दारुमुळे एकूण १६५ जण बाधित झाले होते. यातील ११८ बाधितांवर विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरु आहेत. त्यातील सहा जणांची प्रकृती गंभीर असून इतर बाधितांची तब्येत सुधारत

असल्याची माहिती जिल्हाधिकारी एम.एस. **प्रसथं** यांनी दिली. या प्रकरणी अटक केलेल्या चार दोषींना १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्रासह हरयाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीरमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांसाठी तयारी सुरू केली आहे. हरयाणात ३ नोव्हेंबर रोजी, झारखंडमधे २६ नोव्हेंबर रोजी तर महाराष्ट्रात ५ जानेवारीला विद्यमान विधानसभेचा कार्यकाळ संपत असल्यामुळे तिथं निवडणुका होत आहेत. तसंच जम्मू काश्मीर या केंद्रशासित प्रदेशातही विधानसभेसाठी निवडणूक होत आहे. मतदार यादीत अद्ययावत करण्यासाठी दुसऱ्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासाठी १ जुलै २०२४  हा अर्हता दिवस आहे.

**<><><><><>**

ओबीसी उपोषणाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज संध्याकाळी बैठक बोलावली असून, यात वडीगोद्री इथलं पाच सदस्यांचं शिष्टमंडळ सहभागी होणार आहे.

राज्य सरकारच्या शिष्टमंडळाने आज जालना जिल्ह्यात वडीगोद्री इथं उपोषणाला बसलेले लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांची भेट घेतली. मंत्री गिरीश महाजन, उदय सामंत, अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे, आमदार गोपीचंद पडळकर यांचा या शिष्टमंडळात समावेश आहे. यावेळी उपोषणकर्त्यांनी मुख्यमंत्र्यांशी फोनवरुन संवाद साधला. ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हीच सरकारची भूमिका असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

राजधानी दिल्लीत सुरु असलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे सफरजंग रुग्णालयात काल उष्माघातामुळे दोघांचा मृत्यू झाला आहे. या रुग्णालयात काल उष्माघाताच्या ६ रुग्णांना दाखल करण्यात आलं होतं. त्यातल्या तीघांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनानं दिली आहे. या रुग्णालयात सध्या उष्माघाताचे ४७ रुग्ण दाखल असून त्यातल्या २९ जणांची प्रकृती चिंताजनक आहे. १६ जून पासून या रुग्णालयात एकूण ६२ जणांना दाखल करण्यात आलं होतं. त्यापैकी  आतापर्यंत २४ जणांचा मृत्यू झाल्याची माहितीही रुग्णालयानं दिली आहे.

**<><><><><>**

१८व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव ‘मिफ’चा समारोप आज होणार आहे. या महोत्सवात दिला जाणारा सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठीचा सुवर्णशंख पुरस्कार कोणाला मिळणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. १० लाख रुपये रोख असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. मुंबईत संध्याकाळी होणाऱ्या समारोपाच्या कार्यक्रमात हा पुरस्कार दिला जाईल. यंदा आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात पुरस्काराच्या स्पर्धेत तीन भारतीय माहितीपटांसह एकंदर १४ माहितीपट आहेत. याव्यतिरिक्त सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय शॉर्ट फिक्शन चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट ॲनिमेशनपटाला रौप्य शंख पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. तसंच सर्वात नाविन्यपूर्ण चित्रपटाला प्रमोद पाटी विशेष ज्युरी पुरस्कार दिला जाणार आहे. याशिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धा विभागात सर्वोत्कृष्ट छायाचित्रण, सर्वोत्कृष्ट संकलन आणि सर्वोत्कृष्ट ध्वनी आरेखन असे तीन तांत्रिक पुरस्कारही आज जाहीर होणार आहेत.

**<><><><><>**

भारतीय रेल्वेनं काल जम्मू काश्मिरमधल्या जगातील सर्वात उंचीवरच्या चिनाब पुलावर आठ डब्यांच्या मेमू रेल्वेची यशस्वी चाचणी केली. ही चाचणी

यशस्वी झाल्यामुळे जम्मू काश्मिरमधील राईसी ते बारामुल्ला दरम्यान रेल्वे वाहतूक सुरु होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**<><><><><>**

टी - ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज ऑस्ट्रेलियानं बाग्लादेशचा २८ धावांनी पराभव केला. आजचा दुसरा सामना संध्याकाळी इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान होणार आहे.

**<><><><><>**

बांगला देशच्या प्रधानमंत्री शेख हसीना आज दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. आपल्या या दौऱ्यात त्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांची भेट घेणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याबरोबर द्विपक्षीय चर्चा करणार आहेत.

**//<><><><><>//**